ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २८ | पुणें, बुधवार तारीख १५ ऑगस्ट, १९६२ | अंक १६

## विविध माहिती

**रत्नागिरी येथील कॉलेजला मदत**—रत्नागिरी येथील आर. पी. गोगटे कॉलेजला मदत देण्यासाठी मुंबई येथील बिर्ला मातुश्री सभागृहांत श्री. पु. ल. देशपांडे ह्यांनीं लिहिलेल्या ' तुझें आहे तुजपाशीं ' ह्या यशस्वी नाटकाचा प्रयोग करण्यांत आला. ह्या प्रसंगीं महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांना मुख्य पाहुणे म्हणून बोलावण्यांत आलें होतें. प्रयोगाच्या उत्पन्नांतून कॉलेजला हजारों रुपयांची रक्कम देण्यांत आली.

**सौराष्ट्रामधील शेतकऱ्यांना मदत**—सौराष्ट्रांत शेतीसाठी वापरण्यांत येणाऱ्या विजेबाबत देण्यांत येणारी मदत चालू ठेवण्याचा निर्णय गुजरात सरकारनें घेतला आहे. गुजरातमधील इतर भागांत विजेचा दर कमी असल्यानें सौराष्ट्रांत शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या दर युनिटमागें सरकार १० नये पैसे मदत देत असतें. ही मदत बंद करण्याचा विचार चालू होता; पण आतां तो रद्द झाला आहे.

**अंतरिक्षांतील उपग्रहाचा नाश**—रशिआचे पंतप्रधान मि. कुश्चॉव्ह ह्यांनीं नुकतेंच असें जाहीर केलें होतें कीं, रशिआ अग्निबाणांच्या साह्यानें आकाशांतील माशीसुद्धां मारूं शकेल. अमेरिकन लष्करी शास्त्रज्ञांच्या मतानें ही केवळ दर्पोक्ति नसून रशिआ लवकरच अवकाशांत भ्रमण करणाऱ्या एखाद्या कृत्रिम उपग्रहाचा जमिनीवरून अग्निबाण सोडून नाश करण्याचा प्रयोग करण्याच्या बेतांत आहे.

**दूरदर्शन यंत्रांची निर्यात**—गेल्या वर्षीं जपानमधील टेलिव्हिजनच्या कारखानदारांनीं ८५,००० सेट्स परदेशीं निर्यात केले होते. चालू वर्षीं त्याच्या तिप्पट, म्हणजे २,५०,००० सेट्स निर्यात करण्याचा त्यांचा विचार आहे. गेल्या वर्षीच्या निर्यातीपैकी निम्मी निर्यात अमेरिका व ओकिनावा ह्यांनीं घेतली. अमेरिकेंत सहज बाळगतां येणाऱ्या छोट्या सेट्सना फार मागणी आहे.


### सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल | ... रु. | ३२,५१,४०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,२५,८८४ |
| ठेवी | ... रु. | १,१३,४४,५६६ |
| खेळतें भांडवल | ... रु. | दोन कोटी ६९ लाखांचे वर |

(१) सांगली जिल्ह्यांत बँकेच्या ११ शाखा कार्य करीत आहेत.
(२) सरकारनें या बँकेचे रु. ८ लाख, ५० हजार किंमतीचे शेअर्स घेतले आहेत.
(३) सहकारी संस्थांना शेतीचे गरजेसाठी प्रामुख्यानें कर्जें दिलीं जातात.
(४) कायम ठेवी ४ ते ५ टक्के दरानें स्वीकारल्या जातात.
(५) बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

गुलाबराव रघुनाथराव पाटील
चेअरमन

पंडित भाऊराव टाकवेकर
मॅनेजर

॥ श्री ॥

### दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

कां द्रवपणाचि नीर । सवकाशचि अंबर ।
गोडी तेचि साखर । आन नाहीं ॥ (श्रीज्ञानेश्वरी)

**सोळाव्या स्वातंत्र्य-दिनानिमित्त**

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना अभिवादन व हार्दिक शुभेच्छा !

भारताच्या स्वातंत्र्याचा जयजयकार असो !

के. त्र्यं. चांफेकर,
B. E., A. M. I. E.,
मॅनेजर.


शं. ल. लिमये,
B. Sc., LL. B., Pleader,
अध्यक्ष.

**सुखद हवामानाची बस**—जमशेटपूर येथील टाटा एंजिनिअरिंग कंपनीनें सुखद हवामान राखणारी एक बस तयार केली आहे. बस तयार करण्यास १ लाख रुपये खर्च आला आहे. सुखद हवामान राखणारीं साधनें परदेशाहून आयात केलेलीं आहेत. बसमध्यें १८ प्रवासी बसण्याची सोय आहे. एक छोटेसें स्वयंपाकघर व प्रसाधनाची खोली ह्यांचाहि समावेश करण्यांत आला आहे.

**शरावती नदीवरील वीजकेंद्र**—म्हैसूर राज्यांत शरावती नदीवर बांधण्यांत येत असलेल्या वीजनिर्मिति केंद्राचा पाहिला टप्पा १९६३ अखेर पुरा होईल असा अंदाज आहे. केंद्राचें काम चवथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस-पूर्ण होईल. काम पूर्ण झाल्यावर राज्याला १३·५ लाख किलोवॅट विजेचा पुरवठा होऊ शकेल. राज्यांत काढण्यांत यावयाच्या अल्युमिनमच्या कारखान्याला पुरेशी वीज मग देतां येईल.

**म्हैसूरजवळील कागदाची गिरणी**—म्हैसूरपासून ११ मैलांवर असलेल्या बेलगुला ह्या गांवीं काढण्यांत आलेल्या कागदाच्या गिरणीचें उद्घाटन राष्ट्राध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् ह्यांनीं केलें. उसाच्या चिपाडांपासून वृत्तपत्राचा व लिहिण्याचा कागद तयार करणारी भारतामधील ही पहिलीच गिरणी आहे. प्रारंभीं रोज ३५ टन कागद निर्माण करण्यांत येईल; परंतु पुढें उत्पादन ७० टनांपर्यंत वाढवितां येईल.


**रशिआकडून हेलिकॉप्टर्स घेणार?**— ध्वनिलहरीपेक्षा अधिक वेगानें जाणाऱ्या रशिअन 'मिग' विमानांची पाहाणी करण्यासाठी भारताचें एक तज्ज्ञ मंडळ रशिआला गेलें आहे. रशिआकडून मिळावयाचीं हेलिकॉप्टर्स विमानें लवकर मिळण्याची खटपटाहि मंडळ करणार आहे. सध्यां भारताजवळ रशिआनें पुरविलेलीं २० हेलिकॉप्टर्स आहेत. भारताच्या उत्तर सीमेवरील लष्कराला पुरवठा करण्याच्या कामीं तीं उपयुक्त ठरत आहेत.

स्वातंत्र्य दिन १९६२

आजचा दिवस म्हणजे एका महान यज्ञपूर्तीचें स्मृति-चिन्ह होय. या यज्ञामध्यें गुलामगिरींतून मुक्त होण्यासाठी आपल्या हजारो देशबांधवांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला आहे.

आपण सुद्धां, आपल्या देशाची सेवा करण्यासाठी अशीच त्यागाची आणि आपलें सर्वस्व अर्पण करण्याची वृत्ती अंगी बाणवूंया. आपल्या राष्ट्राच्या योजना सफल करण्यासाठीं आपण एकदिलानें झटून आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्याचा आणि उत्कर्षाचा भक्कम पाया बांधू या.



आपलें राज्य व राष्ट्र शक्तिशाली करा

प्रसिद्धि-संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई

# अर्थ

बुधवार, ता. १५ ऑगस्ट, १९६२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारताला बहुतेक सर्व प्रगत देशांची मदत

अमेरिकेनें भारताला १९५१ पासून १९६१ अखेर १८०५ कोटी रुपयांची मदत केलेली आहे. त्यांपैकी ५११ कोटी रुपये कर्जाऊ दिलेले आहेत, १३२ कोटी रुपयांच्या देणग्या आहेत, १८ कोटी रुपयांच्या किंमतीचें तांत्रिक साह्य आहे आणि ११४५ कोटी रुपये किंमतीचें धान्य वगैरे दिलेलें आहे; त्याची रक्कम भारतानें रुपयांत द्यावयाची आहे. ५११ कोटी रुपयांच्या कर्जापैकी २९६ कोटी रुपयांचें कर्ज रुपयांतच फेडावयाचें आहे. धान्य वगैरेंच्या मोबदल्याचे द्यावयाची जी ११४५ कोटी रुपयांची रक्कम आहे, तिच्यापैकी ९२४ कोटी रुपये भारत सरकारलाच पुन: कर्जाऊ आणि देणगीदाखल देण्यांत आले आहेत. ह्याखेरीज इतरहि मार्गें अमेरिकेनें भारताला मदत केलेली आहे.

अमेरिकेच्या मदतीपैकी ११७ कोटी रुपयांचीं कर्जें व ८६ कोटी रुपयांच्या देणग्या पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत मिळाल्या. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचे तत्सम आंकडे अनुक्रमें ३२८ कोटी रु. आणि ४४ कोटी रु. होते. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील ३१ मार्च, १९६१ अखेरचे तत्सम आंकडे अनुक्रमें ६६ कोटी रु. आणि २ कोटी रु. असे आहेत.

रशियानें १९५५ पासून १९६१ अखेर ३८५ कोटी रु. ची कर्जरूपी मदत केली आहे. ३१ ऑक्टोबर, १९६१ अखेर रशियानें १·१५ कोटी रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत.

ग्रेट ब्रिटनच्या मदतीचा तपशील असा : (१) सुमारें ८६ लक्ष रुपयांचीं पुस्तकें, हिंदी लोकांच्या शिक्षणाची परदेशांत सोय, इ. (२) यंत्रसामग्रीच्या आयातीसाठी १६७ रु. चीं कर्जें. (३) दुर्गापूर स्टील प्लँटसाठी ब्रिटिश बँकांचें १५ कोटी रु. चें कर्ज.

कॅनडा, जर्मनी, जपान, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, स्वित्सरलंड, झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हिया, पोलंड, नॉर्वे, इटली, नेदरलंडस, रुमानिया, इत्यादि देशांनींहि भारताला कमीअधिक प्रमाणांत मदत केली आहे. त्याचप्रमाणें युनायटेड नेशन्स, जागतिक बँक आणि इं. डे. असोसिएशन ह्यांचेंहि साह्य मिळालेलें आहे. म्हणजे, जगांतील बहुतेक सर्व प्रगत देशांनीं भारताला मदत केली आहे.

## जपानच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाचीं कारणें

रिझर्व्ह बँकेच्या नियोजन विभागाचे डायरेक्टर डॉ. एन्. ए. शर्मा जपानच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी तिकडे गेले होते. जपानच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाची पाहाणी करून परत आल्यावर मुंबई येथील रोटरी क्लबमध्यें त्यांचें ह्या विषयावर व्याख्यान झालें. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, युद्धोत्तर काळांत आणि विशेषत: गेल्या दहा वर्षांत जपानच्या अर्थव्यवस्थेनें इतर देशांच्या तुलनेनें चांगली प्रगति केलेली आहे. जपानमधील किंमती स्थिर राहिल्या असून त्यामुळें लोकांची भरभराट झाली आहे. युद्ध संपल्यानंतर जपाननें प्रथम आर्थिक व्यवहार सुरळीत चालण्याकडे लक्ष पुरविलें. हें काम दोन वर्षांपर्यंत पुरलें. त्यानंतर अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्याचें काम हातीं घेण्यांत आलें. हें काम पूर्ण होण्यास १९५२–५३ साल उजाडलें. तेव्हांपासून मात्र जपानच्या उत्पादनांत आणि दरडोई उत्पन्नांत एकसारखी वाढ होत चालली आहे. १९७० च्या सुमारास जपानचें राष्ट्रीय उत्पन्न सध्यांच्या दुप्पट करण्याची आकांक्षा जपानी लोकांनीं व सरकारनें धरली आहे. उत्पादनवाढीचा सध्यांचा वेग चालू राहिला तर ही आकांक्षा सफळ होणें अशक्य नाहीं. जपानचा उत्पादनवाढीचा वेग युद्धांत सांपडलेल्या इतर कांहीं देशांच्या मानानें पुष्कळच चांगला आहे. जपानच्या अर्थव्यवस्थेंतील दोन गोष्टींकडे भारतानें विशेष लक्ष देण्यासारखें आहे. तेथील शेतीचे दर एकरीं उत्पादन वाढत आहे, व शेतीच्या क्षेत्रांत सहकारी संघटनांनीं चांगलें मूळ धरलेलें आहे. आर्थिक बाबतींत जपाननें आपली जी प्रगति करून घेतली आहे तिचीं कारणें अशी सांगतां येतील :—जपानमध्यें बचत करून भांडवल गुंतविण्याची प्रवृत्ति प्रकर्षानें दिसते. त्याशिवाय, तेथील लोक शिस्तप्रिय, कष्टाळू, प्रयोगशील आणि साहसी वृत्तीचे आहेत. त्यामुळेंच जपानची युद्धोत्तर आर्थिक घडी लवकर बसली.

## सहकारी गौळवाडे स्थापन करण्याची सूचना

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत सहकारी गौळवाडे स्थापन करण्याच्या योजना राज्य सरकारांनीं तयार कराव्या अशी सूचना मध्यवर्ती सरकारच्या अन्न व शेतकी खात्यातर्फें करण्यांत आली आहे. गौळवाड्यांची स्थापना व विकास कोणत्या पद्धतीनें करावा आणि त्यांना कोणत्या तऱ्हेनें द्रव्यसाह्य देण्यांत येईल ह्याचें दिग्दर्शनहि खात्यानें केलेलें आहे. तिसऱ्या कार्यक्रमांत ५५ दूधपुरवठा योजना, ग्रामीण भागांत दुग्धपदार्थांचे आठ कारखाने, दुधाच्या भुकटीचे चार कारखाने, आणि खव्यांचे दोन कारखाने काढण्यांत येणार आहेत. ज्या शहरांची लोकसंख्या एक लाखांपेक्षा अधिक आहे, त्यांच्याकरतां व औद्योगिक वसाहतींकरितां दूधपुरवठ्याच्या योजना हातीं घेण्यांत येतील. दूधपुरवठ्याच्या ५५ योजनांपैकीं ३० योजना सहकारी पद्धतीच्या असाव्यात असें ठरविण्यांत आलें आहे. ज्या गांवाची लोकसंख्या एक लाखांपेक्षा कमी आहे त्यांचा दूधपुरवठाहि सहकारी पद्धतीनें करण्यांत यावा अशी सूचना करण्यांत आली आहे. निदान २५ लहान गांवांतून तरी सहकारी पद्धतीनें दूधपुरवठ्याची व्यवस्था करतां येईल असा अन्न व शेतकी खात्याचा अंदाज आहे. ह्या सहकारी दूधपुरवठा योजना चालविण्यासाठी खेड्यांतून १,५०० सहकारी संस्था काढाव्या लागतील. त्याशिवाय दूध गोळा करण्याचीं ३०० केंद्रें, दूध थंड राखणारीं २५ केंद्रें आणि २५० मोठीं सांठवण केंद्रें उभारावीं लागतील. गेल्या कांहीं वर्षांत मोठ्या शहरांतील दुधाच्या पुरवठ्याचा प्रश्न बिकट होत चाललेला आहे. हें काम सहकारी संस्थांमार्फत योग्य तऱ्हेनें झाल्यास ग्रामीण भागांतील दुग्धव्यवसाय बरकतीला येईल आणि मोठ्या गांवांची गरजहि भागेल.

## नव्या करांचा असह्य बोजा
### यंत्रमागांच्या धंद्यावरील संकट

" हातमागांचें यंत्रमागांत हळूहळू रूपांतर करून शेवटीं यंत्रमाग व मोठ्या गिरण्या यांनीच कापडधंद्यांत उत्पादनाचें कार्य करावें असें सरकारचेंच धोरण आहे. परंतु नव्या करांमुळें यंत्रमागांचें अस्तित्वच धोक्यांत आलें आहे. ( सुती कापड विकणारे एक लक्ष दहा हजार यंत्रमाग देशांत आहेत आणि त्यांतले पंचाहत्तर टक्के भाग महाराष्ट्रांत आहेत. ) २४ यंत्रमागांच्या, तीन पाळ्या चालणाऱ्या व साठ हजार वार कापड विकणाऱ्या कारखान्याला पूर्वी रुपये २४४२-०० एक्साईज ड्यूटी द्यावी लागे. आतां ही ड्यूटी रु. ५८४६-०० झाली आहे. ४९ यंत्रमागांच्या कारखान्याच्या बाबतींत हीच ड्यूटी रु. १३,२३०-०० वरून रु. २२,३४७-०० वर गेली आहे. २४० यंत्रमागांचा कारखाना आतां गिरणीसमान मानला जाणार आहे. परिणामतः ६ लाख वारांचें उत्पादन करून रु. ३,२६,४२४-०० इतकी एक्साईज ड्यूटी द्यावी लागेल. पूर्वी ती फक्त रु. ८९,२००-०० होती. हा झाला फक्त यंत्रमागांवरील कर. सूत आणि इतर बाबींवरील कर जमेला धरले तर वाढणाऱ्या बोजाची कल्पना खालील आंकड्यांवरून येईल.

| कारखान्याची व्याप्ति | करांचा वाढीव भार | सरासरी वार्षिक फायदा |
|---|---|---|
| २४ यंत्रमाग | रु. ३१,४१०·०० | रु. २०,००० |
| ४९ यंत्रमाग | रु. ७७,४५४·०० | रु. ४०,००० |
| २४० यंत्रमाग | रु. ११,७१,०००·०० | रु. ३,००,००० |

हे आंकडे इतके बोलके आहेत कीं त्यांना अधिक स्पष्टीकरण करणाची गरज नाहीं. ४९ किंवा अधिक मागांचे कारखाने गिरणीसमान मानून त्यांच्यावर करआकारणी झाल्यानें महाराष्ट्रांतील यंत्रमागचालकांनीं आर्थिक झीज सोसूनहि ते बंद ठेवण्याचें ठरविलें आहे. राज्य व केंद्र सरकारांना माझी अशी विनंती आहे कीं, त्यांनीं या परिस्थितीकडे तांतडीनें लक्ष द्यावें आणि याचे राज्याच्या आर्थिक स्थितीवर काय परिणाम होतील तें अजमावण्यासाठी एक समिति नेमावी. यंत्रमागांचा धंदा हा खेड्यांतहि चालू शकणारा एक विकेंद्रित धंदा आहे. त्याची वाढ थांबेल असें कांहींहि करतां कामा नये. उलटपक्षीं, त्याच्या सुधारणेसाठीं आणि भरभराटीसाठी काय करतां येईल हें सरकारनें पाहिलें पाहिजे. राज्य सरकारनें केंद्रसरकारचें मन वळवून यंत्रमाग धंद्याला या आपत्तींतून वांचविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत." श्री. लालचंद हिराचंद ह्यांचें महाराष्ट्र चेंबरच्या वार्षिक सभेंतील अध्यक्षीय भाषण.

### कानपूरजवळील तंत्रविज्ञानाची संस्था

कानपूरपासून ७ मैलांवर कल्याणपूर येथें स्थापन करण्यांत आलेल्या इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलजी ह्या संस्थेच्या वर्कशॉपच्या इमारतीचें उद्‌घाटन उत्तर प्रदेशाचे मुख्य मंत्री श्री. सी. बी. गुप्ता ह्यांनीं केलें. ह्या इमारतीसाठी ५·५० लाख रुपये खर्च आला आहे. संस्था स्थापन करण्याचे कामीं अमेरिका सहकार्य देत असून ह्या योजनेंतील ही पहिलीच इमारत आहे. सर्व संस्थेसाठी मिळून १५ कोटी रुपये लागणार आहेत. त्यांपैकी ६ ते ८ कोटी रुपये इमारतींवर खर्च होणार आहेत. संस्थेचा पसारा १,०४९ एकरभर होणार आहे. ती स्थापन करण्याच्या कामीं अमेरिकेंतील ९ विद्यापीठांची मदत घेण्यांत आली आहे. २,००० विद्यार्थी शिकण्याची सोय तींत करण्यांत आली आहे.

## बँक अवार्डविरुद्ध सुप्रीम कोर्टांत अपील
### क-२ आणि ड ह्या वर्गाच्या बँकांवर अन्याय


भारतांतील ६८ बँकांच्या नोकरवर्गाचा पगार, भत्ता, इत्यादि बाबत निर्णयावर ( बँक ट्रायब्यूनलचा अवार्ड ) अपील करण्याची युनायटेड इंडस्ट्रिअल बँक लि., कलकत्ता नें मागितलेली स्पेशल लीव्ह सुप्रीम कोर्टानें मंजूर केली. त्याचप्रमाणें, अर्जदार बँकेपुरती अवार्डची अंमलबजावणी तहकूब ठेवली.

अर्जदार बँकेचें म्हणणें असें, कीं शास्त्री अवार्डनें बँकांचें वर्गीकरण अ, ब, क आणि ड असें केलें होतें. वेज अवार्ड कमिशननें पुढें बँकांची वैयक्तिक परिस्थिति लक्षांत घेऊन शास्त्री अवार्डमध्यें दुरुस्ती केली आणि क वर्गाचे दोन भाग पाडले : क १ आणि क २. अर्जदार बँक क २ वर्गांत घालण्यांत आली आणि तिला कमी दरानें महागाई भत्ता द्यावा लागत असे. सध्यांच्या नॅशनल ट्रॅयब्यूनलच्या अवार्डनें बँकांचें वर्गीकरण अ, ब आणि क असें केलें आहे; क-२ आणि ड हे वर्ग रद्द केले आहेत आणि अर्जदार बँक पुनः क वर्गांत समाविष्ट केली गेली आहे. त्यामुळें तिला दरसाल जादा ५४,००० रुपये महागाई भत्ता द्यावा लागणार आहे आणि तो देणें तिला परवडणार नाहीं. वैयक्तिक बँकांची शक्ति लक्षांत न घेतां पगार आणि महागाई भत्ता ठरविण्यांत आल्यामुळें लहान बँकांवर अन्याय झाला आहे. क २ आणि ड हे वर्ग नष्ट करून, ७½ कोटी रुपये खेळत्या भांडवलाखालील सर्व बँका एकच वर्गांत घातल्यानें अर्जदार बँकेसारख्या लहान बँकांचें नुकसान झालें आहे.

[ युनायटेड इं. बँक लि. कलकत्ता हिची स्थापना १९४० ची असून तिचें वसूल भांडवल २८ लक्ष रु. आणि गंगाजळी ४ लक्ष रु. आहे. ठेवी १ कोटी, ३१ लक्ष रु. असून बॅलन्सशीटमध्यें ८९ हजार रु. शिल्लक तोटा आहे. १९६० मध्यें २ हजार रु. नफा झाला; १९५९ मध्यें ९२ हजार रु. तोटा झाला होता. शाखांची संख्या ७ आहे. ]

### कोळशाच्या खाणींना विजेचा पुरवठा

रिहंड धरणावर उत्पन्न करण्यांत येणाऱ्या विजेपैकी ४० हजार किलोवॅट वीज बंगाल व बिहारमधील कोळशाच्या खाणींना पुरविण्याचें उत्तर प्रदेश सरकारनें कबूल केलें आहे. खाणींचा विजेचा पुरवठा निश्चित झाल्यामुळें कोळशाचें उत्पादन वाढविण्याच्या मार्गांतील एक मोठा अडसर दूर झाला आहे. विजेचा पुरवठा करण्यासाठी रिहंड धरणावरील वीजकेंद्र दामोदर नदीखोरें योजनेला जोडावें लागेल.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sur[e]
by fitting
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA
MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

### एंजिनिअरिंगच्या धंद्यांतील उत्पादनांत घट ?

भारताला परदेशीय चलन मिळून देण्याच्या कामीं गेल्या कांहीं वर्षांत एंजिनिअरिंगचा धंदा जोरानें पुढें सरसावत आहे. परंतु ह्या धंद्याच्या उत्पादनांत अडचणी निर्माण झाल्या आहेत. धंद्याला लागणारा कच्चा माल अपुरा पडत असल्यानें तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या धंद्याच्या उत्पादनाचें जें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे तें गांठलें जाईल किंवा नाहीं ह्याविषयीं शंका उत्पन्न झाली आहे. ठरविण्यांत आलेल्या उद्दिष्टांपेक्षा उत्पादन ५० टक्के कमी होईल, असा अंदाज करण्यांत येत आहे. एंजिनिअरिंग असोसिएशन ऑफ इंडिआ ह्या संघटनेचे अध्यक्ष श्री. चौधरी धंद्याच्या परिस्थितीविषयीं बोलतांना म्हणाले कीं, पोलादाच्या पुरवठ्यासंबंधीं चिंता वाटू लागलेली आहे. त्यांतच औद्योगिक शक्तीचा पुरवठा अनिश्चित झाला आहे. त्याचा परिणाम ह्या धंद्यावर होऊन एंजिनिअरिंगच्या मालाच्या निर्यातीवर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या धंद्याची वाढ मोठ्या प्रमाणावर झाली. १९५६ सालीं धंद्यांतील एकूण उत्पादन २०० कोटी रुपये किंमतीचें होतें तें १९६१सालीं ५०० कोटी रुपये किंमतीचें झालें. परंतु आता मात्र प्रगतीचा वेग कमी होत चाललेला आहे. कच्चें लोखंड, पोलाद, लोहेतर धातु, कोळसा, औद्योगिक शक्ति, ह्या सर्वांचीच कमी-अधिक प्रमाणांत टंचाई भासू लागली आहे. पोलादाच्या बाबतींत तर मागणी आणि पुरवठा ह्यांच्यामधील अंतर वाढतच चाललें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील पोलादाच्या उत्पादनाचें उद्दिष्ट गांठलें जाणें कठीण वाटूं लागलें आहे. अर्थातच, एंजिनिअरिंगच्या कारखान्यांच्या उत्पादनावर त्याचा परिणाम होणें अपरिहार्य आहे.

---

### भारी विद्युत्-सामग्रीचा दुसरा कारखाना

रशिआच्या मदतीनें हरद्वार येथें काढण्यांत यावयाच्या भारी विद्युत् सामग्रीच्या कारखान्याची उभारणी दोन हप्त्यांनीं करण्यांत येणार आहे. आग्नेय आशियांतील अशा प्रकारचा हा सर्वांत मोठा कारखाना ठरण्याचा संभव आहे. कारखान्याच्या उभारणीच्या कामास १९६४ च्या प्रारंभीं सुरुवात होईल असा अंदाज आहे. कारखान्यांतील उत्पादनक्षमता संपूर्णपणें उपयोगांत आणली जाऊ लागल्यावर एकूण ७,००० लोकांना त्यांत रोजगार मिळू शकेल. त्यांपैकी १,९०० एंजिनिअर्स व इतर तंत्रज्ञ असतील. कारखाना चालविण्यासाठीं कांहीं भारतीय एंजिनिअर्सना रशियांत शिक्षण देण्यांत येत आहे. परंतु त्याशिवाय कारखान्यामार्फत एक तांत्रिक शिक्षणाची शाळाहि चालविण्यांत येणार आहे. ह्या शाळेंत विशेष कौशल्याचीं कामें करणाऱ्या कामगारांना त्यांच्या कामाचें शिक्षण देण्यांत येईल.

---

### बिहारमधील प्रामाणिक खेडूत

इंडिअन ऑइल कंपनींत काम करणारा एक जर्मन एंजिनिअर बिहारमधील वेड्यावाकड्या रस्त्यावरून जीपनें प्रवास करीत असतां धक्क्यानें गाडींतील त्याची पेटी पडली. पण तें त्याच्या लक्षांत आलें नाहीं. ह्या पेटींत १ लाख रुपयांच्या नोटा व कांहीं महत्त्वाचे कागदपत्र होते. ही पेटी एका खेडुताला सांपडली व त्यानें ती ग्रामपंचायतीच्या कचेरींत आणून दिली. पेटी मालकाला देण्यांत आल्यावर त्यानें खेडुताला शंभर रुपये देऊं केले. परंतु ते नाकारण्यांत आले.

---


श्री. वा. काळे यांचीं दोन नवीं पुस्तकें

१ दाणे आणि खडे किं. रु. २=५०

२ कौटुंबिक हितगुज किं. रु. ३=००

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईंतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

★ सुवर्ण-महोत्सवी वर्ष ★

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई

(दि विदर्भ सहकारी बँक लिमिटेड सम्मीलित)

| मुख्य कचेरी– | विभागीय कचेरी– |
|---|---|
| ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई | महाल-नागपूर |
| टेलिफोन नं. २५५४७४-७५ | तारेचा पत्ता– फार्मर बँक |

: बृहन्मुंबईंतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (७) सांताक्रूझ

: नागपूर विभागांतर्गत शाखा :

(१) सिताबर्डी (२) अमरावती (३) चांदा (४) मलकापूर (५) खामगांव (६) बुलढाणा

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठीं दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. | ३ कोटी, ६० लाख |
| गंगाजळी व फंड | रु. | १ कोटी, ४ लाख |
| ठेवी | रु. | १९ कोटी, १० लाख |
| खेळतें भांडवल | रु. | ५४ कोटी, ८६ लाख |

*महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.*

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

चिं. द. दाते,
कार्यकारी संचालक.

## चोरट्या मार्गानें आलेल्या धनानें समृद्ध बँका

स्वित्सरलंड हा देश तेथील घड्याळांच्या निर्मितीविषयीं जगप्रसिद्ध आहे. पण त्याहिपेक्षा तेथील बँकिंगचा व्यवसाय प्रचंड आहे. स्वित्सरलंडच्या आकाराच्या मानानें त्या देशांतील बँकांची संख्या मोठी आहे आणि तेथील प्रमुख बँकांचा आकारहि व्यापक आहे. जगांतील सर्व देशांतील पैसेवाले लोक आपलें गुप्त धन तेथील बँकांत खातें उघडून सुरक्षित ठेवतात ! शांततेच्या काळापेक्षा युद्धकाळांत अनिश्चितता जास्त वाटते; त्यामुळें युद्धकाळांत स्वित्सरलंडमधील बँकांकडे इतर देशांतून ठेवींचा प्रवाह वाहूं लागतो. स्विस फ्रँकला शंभर टक्के सोन्याचा आधार आहे, तसा ब्रिटिश पौंड किंवा अमेरिकन डॉलर ह्यांना नाहीं. सहाजीकच, ह्या तटस्थ राष्ट्राच्या चलनावर सर्वांचाच अधिक विश्वास असतो. स्विस फ्रँक हा पौंड अथवा डॉलर ह्यांसारखा हेलकावे खात नाहीं. स्वित्सरलंडमधील बँकांत ठेवलेल्या रकमांचा तपशील गुप्त ठेवला जातो; ही हमी फार महत्त्वाची असते. दुसऱ्या महायुद्धाचे वेळीं हिटलरच्या साथीदार पुढाऱ्यांनीं संपत्तीची प्रचंड प्रमाणावर लूट केली आणि ती स्वित्सरलंडमधील बँकांत नेऊन ठेवली; त्याचप्रमाणें ह्या नाझी लुटारूंपासून आपल्या संपत्तीचा बचाव व्हावा ह्या दृष्टीनें इतरांनींहि स्विस बँकांचा आश्रय घेतला. सुप्रतिष्ठा प्राप्त होण्याला, स्विस बँकांना अशा चोरट्या मार्गें आलेल्या संपत्तीचा आधार आहे ! जगांत कुठेंहि चकमकी किंवा युद्ध सुरू झालें, कीं बाकीच्यांवर आपत्ति ओढवते; पण स्विस बँका मात्र गबर होऊं लागतात. इतरांची अडचण म्हणजे त्यांची सुवर्ण संधि ! बँकांतील ठेवींची गुप्तता, ही त्याची गुरुकिल्ली. पण आतां मात्र त्यांचेवर एक प्रसंग ओढवूं पाहात आहे. नाझी छळाला बळी पडलेल्यांच्या संघटनांनीं स्विस सरकारवर दडपण आणून त्याला एक कायदा करण्यास भाग पाडलें आहे; ह्या कायद्याचें बिल स्विस पार्लमेंटांत दाखलहि झालें आहे. पैशांची लूट करणारे नाझी जुलूमशहा आणि आपले पैसे त्यांचेपासून बचावूं पाहाणारे त्यांचीं दुर्दैवी सावजें, ह्यांच्या खात्यांचा तपशील सहा महिन्यांचे आंत सादर करणें ह्या बिलान्वयें स्विस बँकांना भाग पडणार आहे. स्विस बँकर नाइलाजानें ह्याप्रमाणें आपल्या हिशेबाच्या वह्या उघडून दाखवितील; पण " गुप्तता हा आमच्या व्यवसायाचा पाया आहे. विशेषतः ज्याप्रकारें आमच्याकडे संपत्ति विश्वासानें आणून ठेवली जाते, त्याचा विचार करता, हा विश्वासच ह्यापुढें उरणार नाहीं. " असें तेथील बँकर म्हणतात. मुंबईतल्या बँकांमधील सेफ डिपॉझिट व्हॉल्ट उघडून दाखविण्याची सक्ति केली, तर काळाबाजार करणारे व्यापारी ते व्हॉल्ट कशाला भाड्यानें घेतील ? त्यापेक्षाहि बँकांतील ठेवींची गुप्तता हजारों पटीनें बँकांच्या हिताच्या दृष्टीनें महत्त्वाची असते.

---

### शेअरहोल्डर्स : स्त्रिया व पुरुष

अमेरिकेंतील कंपन्यांच्या शेअरहोल्डरांपैकीं ४८% पुरुष असून ५२% स्त्रिया आहेत. ग्रेटब्रिटनमध्यें हेंच प्रमाण अनुक्रमें ५५% आणि ४५% असें आहे. स्त्री-शेअरहोल्डरांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. कारण, ( १ ) स्त्रियांना पुरुषांकडून वारसा म्हणून शेअर्स मिळतात. ( २ ) मृत्यूकर, भागांची तबदिली, इ. टाळण्यासाठी कित्येक पुरुष आपल्या पत्नीच्या किंवा मुलीच्या नांवें शेअर्स घेतात. ( ३ ) आतां पुष्कळ स्त्रिया नोकरी करतात; आपली बचत त्या शेअर्समध्यें गुंतवितात. ( ४ ) शिक्षणाच्या प्रसारामुळें स्त्रियांत जागृति झाली आहे. कंपन्यांच्या सभांस उपस्थित असणाऱ्या स्त्रियांची संख्या खूपच वाढत आहे.




बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
मुगभाट, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

श्री. वा. काळे ह्यांचीं
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें
१ कण आणि क्षण, २ पुढें पाऊल,
३ तुमचें स्थान कोणतें ?

टेलिफोन नं. २४८३.

पुणें सेंट्रल
को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,
लक्ष्मी पथ, पुणें शहर.

इकडे वेळींच लक्ष द्या............
आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा सहकारी बँकेंत गुंतवून निश्चित राहा.

दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून आमचे बँकेनें कायम व सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचे दरांत वाढ केली आहे.

| कायम ठेव | | | व्याजाचे नवीन दर |
|---|---|---|---|
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षें | ... | ... | ४। टक्के |
| ३ वर्षें | ... | ... | ४॥ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव | ... | ... | २॥ टक्के |

या खेरीज शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिट्सवरील व्याजाचे दराबाबत चौकशी करणेसाठी कार्यकारी संचालक यांना बँकेचे वेळेंत समक्ष भेटा. संबंधी सर्व माहिती ते आनंदानें पुरवतील.

बा. ग. अळतेकर, बी. कॉम., कार्यकारी संचालक.
शि. म. काळे, एम्. एल्. ए. अध्यक्ष.

### बुलढाणा जिल्ह्यांतील मातीचें धरण

बुलढाणा जिल्ह्यांतील मलकापूर तालुक्यांत नलगंगा नदीवर एक मातीचें धरण बांधण्यांत येत आहे. धरणाची लांबी १·५ मैल असून तें बांधण्याचें काम १९५९ सालीं चालूं झालें. १९६३ च्या अखेरीस तें पूर्ण होईल. धरणाची उंची ९८ फूट आहे. तें बांधण्यासाठी २·०८ कोटी रुपये खर्च येणार आहे. आतांपर्यंत ४·५ कोटी घनफूट मातीची रचाई करण्यांत आलेली आहे. धरणापासून निघणारा १९ मैल लांबीचा कालवा खोदून तयार आहे. धरण बांधून पुरें झाल्यावर २१,५०० एकर जमिनीला हुकमी पाणीपुरवठा होऊं लागेल. धरणाच्या पाण्यामुळें तीस खेड्यांतील शेतकऱ्यांना फायदा होईल. ह्या खेड्यांची लोकसंख्या १२,००० आहे. धरणावरून जाणारा रस्ता २० फूट रुंदीचा होईल.

---


### लँकेशायरमधील ४ गिरण्या बंद

लँकेशायरमधील कापडाच्या ४ गिरण्या बंद करण्यांत आल्या आहेत. त्या लँकेशायर कॉटन कॉर्पोरेशनच्या मालकीच्या आहेत. कापड उत्पादन करणाऱ्या जगांतील मोठ्या गटांपैकी हा एक गट आहे. गिरण्या बंद झाल्यामुळें सुमारें ७०० कामगार बेकार झाले आहेत. कापडाच्या उत्पादनाची पुनर्घटना करण्यांत येत असल्यानें तात्पुरत्या बेकार झालेल्या ह्या कामगारांना दुसरीकडे काम देण्यांत येणार आहे. १९६२ च्या पहिल्या सहामाहींत लँकेशायरमध्यें दर आठवड्याला १ गिरणी बंद पडली आहे. धंद्यांतील मंदी आणि परदेशीय कापडाची चढाओढ ह्यामुळें हा प्रसंग ओढवला आहे. कॉर्पोरेशन ह्या परिस्थितीला तोंड देण्याचे जोराचे प्रयत्न करीत आहे. कॉर्पोरेशनच्या मालकीच्या कांहीं गिरण्यांतून नवी यंत्रसामग्री बसविण्याचें काम पूर्ण होत आलें आहे. ह्या गिरण्यांतून कापडाचें उत्पादन करण्यास लवकरच सुरवात होईल.

---

### भारतांत येणारे परदेशी प्रवासी

भारतांत येणाऱ्या परदेशी प्रवाशांची संख्या वाढत आहे. १९५७ मध्यें ती ८०,५४४ होती; १९५८ मध्यें ती ९२,२०२; १९५९ मध्यें १,०९,४६४; १९६० मध्यें १,२३,०९५ आणि १९६१ मध्यें १,३९,८०४ झाली. १९६२ मध्यें ती २ लक्षांची मजल गाठील, अशी अपेक्षा आहे. ह्या प्रवाशांमुळें भारताला १९५६ मध्यें १५·५ कोटी रु., १९५७ मध्यें १६ कोटी रु., १९५८ मध्यें १७·५ कोटी रु., १९५९ मध्यें १९·१ कोटी रु. आणि १९६० मध्यें २०·६ कोटी रु. उत्पन्न झालें. ह्या वर्षीं तें २५ कोटी रुपयांवर जाईल. १९६१ सालीं सर्वांत जास्त उतारू अमेरिकेंतून आले; त्यांची संख्या ३१,००० होती. ग्रेटब्रिटनचा (२२,१९१ उतारू) दुसरा अनुक्रम लागला. त्या खालोखाल आफ्रिका (१७,३१३) आणि सिलोन (१४,८३८) येतात.

थेंबें थेंबें तळें साचे....

उसाच्या चिपाडांत शिल्लक राहिलेल्या शेवटल्या रसाच्या थेंबांचें सुद्धा तळें होऊं शकतें आणि त्यांतून तुमचा अधिक फायदा होऊं शकतो. म्हणूनच उसांतून शेवटल्या थेंबापर्यंत रस काढून घेणारे 'किर्लोस्कर' उसाचे चरक वापरून तुमचा पुरेपूर फायदा करून घ्या


वर्षानुवर्ष बिनतक्रार काम देण्याच्या दृष्टीनेच त्यांची रचना केलेली असते

६, १० व १५ हॉर्सपॉवरचे आणि २, ४ व ६ बैलांकडून चालणारे असे निरनिराळ्या आकारांतील चरक तयार होतात




किर्लोस्कर

पॉवरवर चालणारा उसाचा चरक



किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड

किर्लोस्करवाडी, जि. सांगली.

STUSA KM 4A3

## वाढलेल्या राष्ट्रीय उत्पन्नाची विषम वांटणी

भारताच्या दोन पंचवार्षिक योजना पुऱ्या होऊन तिसरी कार्यान्वित झाली आहे. पंचवार्षिक योजनांचा मुख्य उद्देश देशांतील लोकांचें राहणीचें मान सुधारावें हा असल्यानें, हा उद्देश कितपत साध्य झाला आहे असा प्रश्न विचारण्यांत येत असतो. दोन पंचवार्षिक योजनांमुळें देशाच्या उत्पन्नांत जी वाढ झाली तिची वांटणी कशी झाली अगर होते हा प्रश्न पहिल्या प्रश्नाशीं साहजिकच निगडित आहे. १९६० च्या ऑक्टोबरमध्यें हा प्रश्न लोकसभेंत उपस्थित करण्यांत आला असतांना पंतप्रधान पंडित नेहरू ह्यांनीं सदर प्रश्नाचा अभ्यास करण्यांत येईल, असें आश्वासन दिलें होतें. आश्वासनाला अनुसरून प्रा. महालनवीस ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमण्यांत आली होती. कमिटींतील तज्ज्ञांनीं आपला अभ्यास पुरा केला असून कांहीं निष्कर्ष काढले आहेत. अर्थात् हे निष्कर्ष अंतिम स्वरूपाचे नाहींत; तरीपण अभ्यासपूर्वक काढलेले निष्कर्ष म्हणून त्यांचें महत्त्व आहेच. दोन पंचवार्षिक कार्यक्रमांमुळें राष्ट्रीय उत्पन्नांत जी वाढ झाली तिच्या वांटणीविषयीं कमिटीनें असें मत व्यक्त केलें आहे कीं, औद्योगिकरणाच्या पहिल्या अवस्थेंत नव्यानें उत्पन्न झालेल्या संपत्तीचें केंद्रीकरण होणें अपरिहार्य आहे. विशेषतः, जे उद्योगधंदे देशांत पहिल्या प्रथमच उभारण्यांत येत आहेत त्यांच्या बाबतींत संपत्तीचें केंद्रीकरण टाळतां येण्यासारखें नाहीं. सिमेंटच्या व रसायनाच्या उद्योगधंद्यांत मालकी हक्काचें केंद्रीकरण फार मोठ्या प्रमाणावर झालेलें आढळून येतें. पेंटस् व व्हार्निशेस ह्यांचा धंदा मात्र अपवाद आहे. साखर व वनस्पति तेल ह्या धंद्यांत मात्र केंद्रीकरण कमी प्रमाणावर झालेलें आहे. सिमेंटच्या बाबतींत असें आढळून आलें आहे कीं, ह्या धंद्यांतील एक औद्योगिक गट देशांतील ४५ टक्के सिमेंटच्या उत्पादनावर आपली हुकमत चालवूं शकतो. रासायनिक उद्योगधंद्यांतील एक मोठा गट रासायनिक पदार्थांच्या उत्पन्नापैकी ३० टक्के उत्पन्नावर नियंत्रण ठेवूं शकतो.

तथापि, गेल्या दहा वर्षांत देशांतील सर्व दर्जांच्या लोकांच्या उत्पन्नांत खरीखुरी वाढ झालेली आहे. ह्याला अपवाद म्हणजे शेतीवर काम करणाऱ्या मजुरांची. त्यांचें खरें उत्पन्न मात्र ११·८ टक्क्यांनीं खालीं घसरलेलें आहे. अजूनहि शहरांतील लोकांचें दरमाणशीं उत्पन्न ग्रामीण भागांतील लोकांच्या दरमाणशीं उत्पन्नांपेक्षा बरेंच अधिक आहे. तथापि, गेल्या दहा वर्षांत ही परिस्थिति थोडी सुधारली आहे. १९६० सालीं एकूण राष्ट्रीय उत्पन्नांतील ग्रामीण भागाच्या उत्पन्नाचें प्रमाण ७० टक्के होतें आणि हें उत्पन्न देशांतील ८३ टक्के लोकांत वाटलें गेलेलें होतें. उरलेलें ३० टक्के उत्पन्न नागरी विभागांतून आलेलें होतें आणि तें १७ टक्के लोकांत वांटण्यांत आलेलें होतें. १९५१ ते १९६१ ह्या दहा वर्षांच्या कालांत रोजगार असलेल्या लोकांचें एकूण उत्पन्न ४० टक्क्यांनीं वाढलेलें आहे. तथापि, ह्या कालांत पदार्थांच्या किंमतीहि वाढलेल्या आहेत. किंमतीमधील वाढ १९ टक्के असल्यामुळें लोकांच्या खऱ्या उत्पन्नांत झालेली वाढ २१ टक्के येवढीच भरते. निरनिराळ्या धंद्यांत काम करणाऱ्या कामगारांच्या उत्पन्नवाढीचा विचार केला तर असें दिसतें कीं, जास्तींत जास्त फायदा कोळसा-कामगारांना झालेला आहे. त्यांच्या उत्पन्नांत ७६ टक्के वाढ झालेली आहे. त्याशिवाय इतर कारखान्यांतून काम करणाऱ्या कामगारांच्या उत्पन्नांत २० टक्के वाढ झालेली आहे. इतर कांहीं रोजगार असणाऱ्यांच्या उत्पन्नांत झालेली वाढ अशी आहे:—शिक्षक १८ टक्के; रेल्वेमधील नोकरवर्ग ८ टक्के; ग्रामीण भागांतील कुशल कामगार १५ टक्के; कोळसाखाणी सोडून इतर खाणींत काम करणारा नोकरवर्ग १५ टक्के. खऱ्या उत्पन्नाची सगळ्यांत कमी वाढ झाली ती मध्यवर्ती सरकारच्या नोकरांची. गेल्या दोन पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत त्यांच्या खऱ्या उत्पन्नांत फक्त १ टक्क्यानें वाढ झाली.

### खाजगी विभागांतील कारखान्यांचे परवाने

खाजगी मालकीच्या विभागांतील कारखानदारांना उद्योगधंदे काढण्यासाठी देण्यांत आलेल्या परवान्यांची भारत सरकार तपासणी करीत आहे. ज्या कारखानदारांनीं परवाने घेऊन कारखाने काढण्याच्या कामीं परिणामकारक काम केलेलें नसेल त्यांचे परवाने रद्द करण्यांत येत आहेत. ज्या कारखानदारांना परवाने दिले असतील त्यांनीं आळशीपणा करून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमधील उद्दिष्टांतील पूर्तीच्या कामीं अडचणी आणूं नयेत म्हणून ही तपासणी करण्यांत येत आहे. परवाने घेऊनहि काम न केलेल्या कारखानदारांना नोटिसा देण्यांत येत असून, तीन आठवड्यांच्या आंत त्यांच्याकडून खुलासा मागविण्यांत येत आहे. कारखानदारांकडून आलेला खुलासा सरकारला समाधानकारक वाटला नाहीं तर पहिल्या कारखानदाराचा परवाना रद्द करून, तो दुसऱ्या योग्य कारखानदाराला देण्याचें सरकारचें धोरण आहे.

### चीनची व भारताची तुलना

हिंदचे रशियांतील माजी वकील श्री. कें. एस्. मेनन ह्यांनीं कोलंबो येथें एका व्याख्यानसत्रांत चीनची व भारताची तुलना केली. ते म्हणाले कीं, माओ-त्से-टुंग ह्यांच्या म्हणण्याप्रमाणें चीन हा देश नुसताच गरीब नाहीं. इतिहासाच्या दृष्टीनें तो कोरा आहे. भारताची मात्र अशी स्थिति नाहीं. भारताचा इतिहास कित्येक शतकांचा आहे. भारतानें गेल्या कांहीं वर्षांत बरीच आर्थिक प्रगति केलेली आहे. अणुविज्ञानाच्या बाबतींतसुद्धां भारताचा क्रमांक जगांतील पहिल्या पांच देशांत लागतो. मनांतच आणलें तर भारत स्वतःचा अणुबाँब निर्माण करूं शकेल. पण पंतप्रधान नेहरू ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें भारत तसें करणार नाहीं. चालू शतकाच्या अखेरीस भारत हा एक प्रचंड औद्योगिक देश होईल ह्यांत शंका नाहीं.


### ध्वनिक्षेपणाची यंत्रसामग्री

बंगलोर येथील सरकारी मालकीच्या भारत इलेक्ट्रॉनिक्स ह्या कंपनीनें कांहीं खास प्रकारची ध्वनिक्षेपणाची यंत्रसामग्री बनविण्याचें ठरविलें आहे. ह्या कामीं एका ब्रिटिश कंपनीची मदत घेण्यांत आली आहे. मदतीबाबत झालेल्या कराराप्रमाणें ब्रिटिश कंपनी भारतीय तंत्रज्ञांना शिक्षण देणार असून शिवाय आपल्या तंत्रज्ञांचें सहकार्यहि देणार आहे. भारत इलेक्ट्रॉनिक्स कारखान्यानें बनविलेलीं अनेक प्रकारचीं रेडिओचीं उपकरणें भारत सरकारचीं खातीं वापरीत असतात.

### कॅन्सरचा रोग वाढत आहे

मॉस्को येथें आठवी आंतरराष्ट्रीय कॅन्सरविरोधी काँग्रेस भरविण्यांत आली होती. काँग्रेसला आलेल्या एका अमेरिकन तज्ज्ञानें असें सांगितलें कीं अमेरिकेंत फुप्फुसाच्या कॅन्सरचें प्रमाण वाढत चाललें आहे. अमेरिकन शास्त्रज्ञांच्या मतानें धूम्रपान, मोटारीमधील पेट्रोलचा धूर आणि दूषित होत जाणारें वातावरण, ह्या गोष्टी वाढीस कारणीभूत आहेत.

## नाशिक जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचे अनुभवी मार्गदर्शक



**प्राध्यापक श्री. गो. पुराणिक**

प्रा. श्रीनिवास गोविंद पुराणिक ऊर्फ दादासाहेब पुराणिक यांचा जन्म पूर्वीच्या दक्षिण महाराष्ट्रांतील जमखंडी या संस्थानच्या राजधानींत दिनांक ४ डिसेंबर, १९०४ रोजीं झाला. त्यांचें सर्व शालेय शिक्षण तेथेंच झालें. ते सन १९२० सालीं त्यावेळच्या मुंबई युनिव्हर्सिटीची मॅट्रिक परीक्षा उत्तम मार्कांनीं पास झाले व पुढील उच्च शिक्षणासाठी ते त्या जमखंडी राजधानींतून (संस्थान) निघून सांगली या दुसऱ्या संस्थानच्या राजधानींत गेले. तेथें त्यांनीं विलिंग्डन कॉलेजांत प्रवेश घेतला. दादांची आवड लहानपणापासून अखंड समाजसेवेची असल्यानें त्यांनीं डॉक्टर होण्याचें ध्येय पुढें ठेवलें, व त्याप्रमाणें त्यांनीं एकदोन वर्षांनंतर मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजांत प्रवेश मिळवून आपल्या भावी आयुष्याच्या पायाभरणीस सुरवात केली. परंतु मुंबईचें धावपळीचें जीवन व मुख्यत्वें मुंबईची हवा त्यांच्या शरीरप्रकृतीस न मानवल्यानें शेवटीं ठरविलेल्या ध्येयपूर्तीस त्यांना मुकावें लागलें. डॉक्टरचे सल्ल्यानें १९२३ सालीं मुंबापुरी सोडून परत सांगलीस जावें लागलें. तेथें त्यांनीं आर्टस् शाखेंत प्रवेश घेऊन इ. स. १९२७ सालीं बी. ए. च्या परीक्षेंत अर्थशास्त्र हा विषय घेऊन उत्तम मार्कांनीं यश मिळविलें. पण परिस्थितीमुळें त्यांना पुढें जातां येईना. शेवटीं दादांनीं आपल्या मूळ गांवीं माध्यमिक शाळेंत शिक्षकाची नोकरी पत्करली. दोन वर्षें लोटल्यानंतर दादांना ध्येयपूर्तीची जाणीव होऊन त्यांनीं पुणें येथील प्रा. गाडगीळ ह्यांच्या गोखले इन्स्टिट्यूट या संस्थेंत प्रवेश मिळवून त्यांनीं तेथील नामवंत अर्थशास्त्रज्ञ प्रा. धनंजयराव गाडगीळ या थोर व्यक्तीच्या सान्निध्यांत आपला दोन वर्षांचा काल घालविला व ते १९३१ सालीं एम्. ए. ची परीक्षा राजकारण व अर्थशास्त्र हे विषय घेऊन उत्तीर्ण झाले. त्याचवेळीं त्यांनीं "मोबिलायझेशन ऑफ ॲग्रिकल्चरल क्रेडिट" या विषयावर आपला निबंध दाखल केला. त्याबद्दल त्यांना मुंबई युनिव्हर्सिटीकडून सर डॅनियल हॅमिल्टन पारितोषक बहाल करण्यांत आलें.

त्यांच्या पुण्यनगरींतील वास्तव्यांतच नाशिक जिल्ह्यांतील त्यावेळचे होतकरू तरुण व लॉ कॉलेजचे विद्यार्थी कै. मा. भाऊसाहेब हिरे यांचा परिचय झाला व उभयतांची मैत्री अखेरपावेतों कायम राहिली.

दादांनीं आपलें शिक्षण पूर्ण करून आपलें पुढील जीवन हं. प्रा. ठा. कॉलेज, नाशिक येथें इ. सन. १९३२ मध्यें अर्थशास्त्राचे प्रोफेसर या नात्यानें सुरू केलें. तद्नंतरच्या अल्पशा अवधींतच त्यांनीं एक अत्यंत उत्कृष्ट प्राध्यापक म्हणून नांवलौकीक मिळविला. ह्याच संस्थेंत त्यांना १९५२ मध्यें व्हाईस प्रिन्सिपॉल व सन १९५६ मध्यें प्रिन्सिपॉल म्हणून नियुक्त करण्यांत आले. प्राचार्य दादासाहेब पुराणिकांचे प्रयत्नामुळेंच नासिक येथें कॉमर्स कॉलेज सुरू होऊं शकलें. हें एक त्यांच्या जीवनांतील महान् कार्य होय. या वाढत्या जबाबदारीबरोबरच त्यांनीं आपल्या सार्वजनिक क्षेत्रांतील कार्यास निकडीनें प्रारंभ केला.

१९५४ च्या सुमारांस प्राध्यापक पुराणिकांनीं नाशिक जिल्ह्याची औद्योगिक पाहणी करण्याचें कार्य केलें. याच सुमारास नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रस्थापनेसाठी प्रयत्न करींत असतांना त्यांचें नाशिक जिल्ह्यांतील आर्थिक, औद्योगिक व सहकारी क्षेत्रांत कार्य करणाऱ्या व्यक्तींशीं जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. जिल्ह्याच्या सार्वजनिक जीवनांत ते या वेळेपर्यंत संपूर्ण समरस झाले होते. याच वेळीं नाशिक सारख्या जिल्ह्याच्या ठिकाणीं, जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सहकारी बँक निघणें अत्यावश्यक म्हणून त्या दिशेनें कै. भाऊसाहेब हिरे यांचे प्रयत्न सुरू होते. कै. भाऊसाहेबासारख्या तळमळीच्या व ज्येष्ठ कार्यकर्त्याला डॉ. गाडगिळांच्या पाठिंब्यामुळें नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निघण्याचें निश्चित झालें. त्याबाबतची सर्व जबाबदारीचीं सूत्रें त्या उभयतांनीं प्रा. पुराणिकावर सोंपविलीं. या त्रिमूर्तींच्या प्रयत्नांनीं लवकरच म्हणजे दिनांक २६ जानेवारी १९५५ रोजीं नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना झाली व बँकेच्या चेअरमनपदीं दादांची नियुक्ति करण्यांत आली. त्यांनीं ती धुरा अति यशस्वी रीत्या वाहिली. त्याहीपेक्षा अध्यापनव्यवसायांतील अर्थशास्त्राची व्यवहाराशीं सांगड घालून शेतकरी, कामकरी, विणकर, या सर्वांच्या विकास कार्यास प्रा. पुराणिक यांनीं बँकेचे चेअरमन या नात्यानें कमालीची पराकाष्ठा केली. त्यायोगेंच जिल्ह्यांतील जनता त्यांना हितचिंतक व सर्वांच्या प्रगतीकरितां योग्य वाटाड्या मिळाल्याच्या समाधानांत होती. त्याचें प्रत्यंतर त्यावेळच्या प्रत्येक फील्डवर्कर्सच्या व बँकेच्या वार्षिक साधारण सभेच्या वेळीं यायचे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बँकेचें काम झपाट्यानें व भरभक्कम पायावर वाढलें. त्यांचा बँकेच्या चेअरमनपदाचा अनुभव व जोडीला अर्थशास्त्राचा अभ्यास याचा योग्य उपयोग होण्याच्या दृष्टीनें त्यांची त्यावेळच्या मुंबई राज्य सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर व त्याचप्रमाणें त्याच्या कार्यकारी कमिटीवर निवड झाली. त्यांनीं जिल्हा बँकेवर सन १९५५–५८ पर्यंत चेअरमन म्हणून काम केले. त्या अवधींत बँकेचें खेळतें भांडवल २१ लाखांवरून १ कोटी, ३४ लाखांवर नेलें. आरंभीच्या काळांत बँकेच्या फक्त ४ शाखा जिल्ह्यांत होत्या त्यांची संख्या १९५८ सालअखेर १२ वर गेली. त्यानंतर माननीय कै. भाऊसाहेब यांनीं चेअरमनपद भूषविलें. याच काळांत प्रा. पुराणिकांची राज्य सरकारकडून नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर नियुक्ति करण्यांत आली. त्यांच्या बहुमोल ज्ञानाचा उपयोग बँकेच्या विकासाकडे मा. कै. भाऊसाहेब यांनीं करून घेतला. या कालावधींतहि प्रा. पुराणिकांचा व्हाईस चेअरमन या नात्यानें बँकेशीं घनिष्ट संबंध कायम होता. याच काळांत दिनांक ६ मार्च १९६० रोजीं दुर्दैवानें या अनंत जबाबदाऱ्या सांभाळतांना त्यांची प्रकृति एकाएकीं बरीच बिघडली तरी सुद्धां माननीय कै. भाऊसाहेबांच्या दुःखद निधनानंतर देखील जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांनीं चेअरमनपदाची धुरा त्याचेकडे पुनः सोंपविली. आज या आजारपणाच्या अवस्थेंतदेखील ते जिल्हाभर ३० शाखा असलेल्या व ५ कोटींपर्यंत खेळतें भांडवल असणाऱ्या नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा कारभार बारकाईनें पाहतांना त्यांच्या अखंड समाजसेवेबद्दल व कार्यतत्परतेबद्दल प्रत्येकांस आश्चर्य वाटतें. त्यांचें मार्गदर्शन जिल्ह्यांतील सहकारी प्रगतीस दीर्घ काळ लाभावें, अशीच सर्वांची ईश्वराजवळ प्रार्थना आहे.

## नवनवीन औषधांबाबत सावधगिरीची आवश्यकता

गेल्या कांहीं दिवसांत भारतामधील अनेक शहरांतून कमी प्रतीच्या औषधांची विक्री मोठ्या प्रमाणावर होत असल्याचें आढळून आलें. ज्या कंपन्यांनीं अशीं औषधें तयार करून बाजारांत आणलीं त्यांचीं नांवें डॉक्टर्सना व इतर वैद्यकीय संस्थांना कळविण्यांत आलीं असून तीं औषधें वापरण्याविरुद्ध इशारा देण्यांत आला आहे. ह्या प्रकरणांत औषधाचा दर्जा निकृष्ट होता एवढीच तक्रार होती; परंतु औषधाचा दर्जा चांगला असला तरी मुळांतच एखादें औषध मानवी देहाला मानवेल किंवा नाहीं हा प्रश्न शिल्लक राहतोच. ब्रिटन, अमेरिका, पश्चिम जर्मनी, इत्यादि देशांतून थालिडोमाइड नांवाचें एक औषध गर्भवती स्त्रियांना प्रारंभीच्या कांहीं काळांत देण्यांत येत असतें. ह्या औषधामुळें स्त्रियांना कमी त्रास होतो. पण अलीकडे ह्या औषधाची भयानक बाजू उजेडांत आली आहे. हें औषध एका जर्मन कंपनीनें प्रथम १९५४ सालीं शोधून काढलें. त्यानंतर पश्चिम जर्मनी, ब्रिटन, स्वीडन, कॅनडा, ह्या देशांत त्याच्या चांचण्या घेण्यांत आल्या आणि गर्भवती स्त्रियांनाहि तें देण्यांत आलें. १९५८ सालीं तें औषध बाजारांत आणण्यांत आलें. चालू वर्षाच्या आरंभीं डॉक्टर्सना असें आढळून आलें कीं, हें औषध घेणाऱ्या मातांना होणाऱ्या मुलांत विद्रूप अगर एखादा अवयवच नसलेल्या मुलांचें प्रमाण वाढत आहे. पश्चिम जर्मनींत अशा प्रकारचीं ४,००० मुलें जन्मलीं; ब्रिटनमध्यें १,००० मुलें विद्रूप निपजलीं. आतां हें औषध बाजारांतून काढून घेण्यांत आलें आहे. नव्या औषधांची सुरक्षितता कोणी व कशी ठरवावयाची असा प्रश्न पाश्चात्य देशांत जोरानें पुढें आला असून त्यावर साधकबाधक चर्चा चालू आहे. आतांपर्यंत औषध काढणारी कंपनीच औषधांच्या गुणांची चांचणी घेते व ग्वाही देते.

## क्रुश्चॉव्हच्या भाषणाला वृत्तपत्रांत जाहिरातीनें जागा

रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चॉव्ह ह्यांच्या निःशस्त्रीकरणाविषयींच्या एका भाषणाला अमेरिकेंतील कित्येक वृत्तपत्रांनीं जाहिरातीच्या दरानें प्रसिद्धि दिली आहे. कांहीं वृत्तपत्रांनीं हें भाषण छापण्यास एक अट पुढें केली. गेल्या वर्षी अमेरिकेचे अध्यक्ष मि. केनेडी ह्यांनीं संयुक्त राष्ट्रसंघटनेपुढें केलेलें भाषण रशिआच्या 'प्रावदा' पत्रानें जाहिरातीच्या दरानें छापावें असें सुचविण्यांत आलें. प्रे. केनेडी ह्यांचें भाषण 'प्रावदा' नें प्रसिद्ध केल्यास मि. क्रुश्चॉव्ह ह्यांचें भाषण प्रसिद्ध करण्याची तयारी त्यांनीं दाखविली. 'प्रावदा' कडून असें उत्तर आलें कीं जाहिराती छापण्याची त्याची प्रथा नाहीं. रशिआनें चालविलेल्या अणुस्फोटांची माहिती खुद्द रशियन वृत्तपत्रांत येत नसता मि. क्रुश्चॉव्ह ह्यांचें भाषण मात्र अमेरिकेंत प्रसिद्ध होऊं शकतें ह्याबद्दल अमेरिकेंत वैषम्य वाटत आहे.

## कुटुंबनियोजनाच्या शस्त्रक्रिया बेकायदा ?

कुटुंबनियोजनासाठी स्त्रियांवर अगर पुरुषांवर करण्यांत येणाऱ्या शस्त्रक्रिया बेकायदा आहेत, असें बंगालमधील कायदातज्ज्ञांचें मत असून, बंगाल सरकारनें ते भारत सरकारच्या आरोग्य खात्याला कळविलें आहे. नवऱ्याच्या अगर बायकोच्या संमतीनें केलेली अशा प्रकारची शस्त्रक्रिया कायदेशीर आहे, असें आरोग्य खात्याचें मत आहे. बंगालमध्यें कुटुंबनियोजनाचा प्रसार चांगला होत असून, अधिकाधिक स्त्रीपुरुष शस्त्रक्रिया करून घेत आहेत.

## चित्रपट कंपनीला परदेशीय चलन

मुंबईमधील एक चित्रपट कंपनी परदेशांत जाऊन 'संगम' ह्या नांवाचा एक चित्रपट काढणार आहे. चित्रपटनिर्मात्याच्या परदेश प्रवासासाठी ३·२ लाख रुपयांचें परदेशीय चलन मंजूर करण्यांत आलें आहे. ह्या कंपनीनें आतांपर्यंत बरेंच परदेशीय चलन मिळविलेलें आहे. चित्रपट तयार झाल्यावर तो प्रथम युरोपमध्यें दाखविला जाईल. अशा रीतीनें १२ लाख रुपयांचें परदेशीय चलन मिळविण्यांत आल्याशिवाय सदर चित्रपट भारतांत दाखविण्यांत येणार नाहीं असें बंधन कंपनीवर घालण्यांत आलें असून तें कंपनीनें मान्य केलें आहे. उद्योगधंद्यांनीं स्वतःस लागणारें परदेशीय चलन मिळविण्याचे प्रयत्न निर्यातीच्या द्वारें केल्यास अशा प्रयत्नांना उत्तेजन देण्यांत येत असतें.

## ट्रॉंबे येथील तेल शुद्ध करण्याचा कारखाना

गुजरातमध्यें अंकलेश्वरनजिक सांपडलेल्या अशुद्ध तेलाच्या विहिरीपासून उत्पन्न होणारें तेल मुंबई येथील ट्रॉंबे तेलशुद्धीच्या कारखान्याकडे पाठविलें जातें. गेल्या फेब्रुवारी महिन्यापासून रेल्वेनें अशुद्ध तेलाची वाहतूक करण्याचें काम सुरू केलें. तेव्हांपासून आतांपर्यंत १५० खास गाड्यांनीं कारखान्याला तेलाचा पुरवठा केला. अंकलेश्वर येथील खाणी नव्या असल्यानें तेलाचा इतपत पुरवठा करता आला, ही गोष्ट समाधानकारक मानण्यांत येत आहे. दरम्यान अंकलेश्वर भागांत आणखी विहिरी खोदण्याचें काम चालू आहे. ४५ विहिरी नव्यानें खणण्यांत आल्या आहेत. सध्यां तेथील तेल–विहिरींमधून दररोज १,२०० टन तेल उपसण्यांत येतें. लवकरच रोज १,५०० टनांपर्यंत उत्पादन वाढेल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. उत्पादन वाढल्यास त्याची वाहतूक करण्याविषयीं रेल्वेकडे विचारणा करण्यांत आली आहे.

## हायकोर्टांच्या न्यायमूर्तींचा पगार

मद्रास हायकोर्टाच्या स्थापनेचा १०० वा वर्धापन दिन भारताचे सर न्यायाधीश श्री. बी. पी. सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. ह्या प्रसंगीं भाषण करतांना श्री. सिन्हा ह्यांनीं हायकोर्टांत काम करणाऱ्या न्यायमूर्तींचें निवृत्तीचें वय ६२ ऐवजीं ६५ असावें अशी सूचना केली. त्यांच्या वेतनाविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं, हायकोर्टाची स्थापना करण्यांत आली त्या वेळीं त्यामधील न्यायाधीशांना ४,००० रुपये दरमहा ठरविण्यांत आला. ह्या पगाराची खरेदीची शक्ति सध्यांच्या तेवढ्याच रकमेच्या खरेदीच्या शक्तीपेक्षा १० पटीनें अधिक आहे. भारताची घटना अंमलांत येईपर्यंतच्या ७० वर्षांच्या काळांत ह्या पगारांत बदल करण्यांत आला नाहीं. घटना अंमलांत आल्यावर न्यायाधिशांचा पगार कमी करण्यांत आला.

## नगर जिल्ह्यांतील १२ वा साखर कारखाना

कोपरगांवजवळ संजीवनी सहकारी साखर कारखान्याच्या कचेरीच्या इमारतीचा पायाभरणी समारंभ झाला. हा साखर कारखाना १९६३ च्या एप्रिल महिन्यांत उत्पादनास प्रारंभ करील. नगर जिल्ह्यांतील हा १२ वा साखर कारखाना आहे. कोपरगांव रेल्वे स्टेशनजवळ ५० एकर जमीन कारखान्यासाठी घेण्यांत आली आहे. कारखान्याच्या उभारणीस १·५ कोटी रुपये भांडवल लागेल.

तार : सेन्को बँक

दूरध्वनि : २२४८३

**स्वतंत्र भारताचा १५ वा वाढदिवस, आपण उत्साहानें साजरा करूं.**

पण त्याचबरोबर स्वतंत्र भारताची पुढली वाटचाल अधिक यशस्वी करण्याकरितां आपलें आर्थिक बळ एकवटण्याचाहि निश्चय करूं.

**संपन्न भारताच्या निर्मितीसाठी आमची सहकारी बँक सतत निष्ठापूर्ण सेवा करीत आहे.**

# पुणें सेंट्रल को-ऑप. बँक लि.,

लक्ष्मी पथ, पुणें २.

★★★

★ भाग भांडवल : ५२ लाखांचे वर.
★ खेळतें भांडवल : ७। कोटींचे वर.
★ ठेवी : ३। कोटींचे वर.
★ खेडोपाडीं तीस शाखांचें जाळें.

आणि सुरक्षित ठेवघरें.

**वा. ग. अळतेकर,**
कार्यकारी संचालक

**शि. म. काळे,**
अध्यक्ष

**★ भारताच्या १६ व्या स्वातंत्र्यदिनाचें आम्ही स्वागत करतों. ★**

सहकारी तत्त्वावर शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठीं सतत प्रयत्न करीत असलेला—

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लिमिटेड

तार :— SANCOSOP ]   १२५, भवानी पेठ, पुणें २.   [ फोन :—१३११५

*आपल्यासाठीः—*

★ संस्थेनें साडेपांच लाख रुपये खर्च करून शेतीमधील नाशवंत मालासाठी अद्ययावत् शीतगृह विकत घेतलें आहे. त्या ठिकाणीं भाजीपाला, फळफळावळ, अंडीं, दुधाचे पदार्थ चांगल्या रीतीनें राहूं शकतात.

★ भरघोस उत्पादनासाठीं उत्कृष्ट खतांचा पुरवठा करीत आहे. तसेंच, संघानें स्वतःचें मिश्रखत उसासाठी व भाजीपाल्यासाठी तयार केलेलें आहे व तें किफायतशीर भावांत शेतकरी व सोसायट्या यांना पुरविलें जातें.

★ शेती-मालाच्या विक्रीसाठी हुकमी गिऱ्हाईक मिळविण्याची व्यवस्था केली आहे.

★ शेतकऱ्यांना लागणारीं खतें, बीं-बियाणें, अवजारें, लोखंड, सिमेंट, पत्रा, वगैरे माल नियंत्रित दरांत पुरविण्याची व्यवस्था संघामार्फत होत असते.

★ उत्तम प्रकारचा आंबेगांवचा निर्भेळ आंबेमोहोर तांदूळ ४० किलोंच्या पिशव्यांमध्यें विक्रीस ठेवला आहे.

★ खात्रीचें स्नो-बॉल कॉली-फ्लॉवरचें बीं परदेशांतून मागवून विक्रीसाठी ठेवलें आहे.

**मुगुटराव साहेबराव काकडे देशमुख,**
अध्यक्ष.

**श्री. म. उपळेकर,** एम्. ए., एलएल्. बी.
कार्यकारी संचालक

**बबुराव बळवंतराव धुमाळ,**
उपाध्यक्ष.

**सं. सा. काकडे,** बी. ए., एलएल्. बी.
व्यवस्थापक.

## भारताच्या १६ व्या स्वातंत्र्यदिनाचें स्वागत·

अल्पावधींत जनतेच्या विश्वासास पात्र झालेली, प्रगतिपथाकडे धांव घेणारी व जनतेच्या सेवेस सदैव तत्पर राहणारी

# जनता सहकारी बँक लि., सांगली

कराळे बिल्डिंग, हायस्कूल रोड, सांगली

रजिस्टर नंबर २४०९८. स्थापना १७ डिसेंबर १९६०. फोन नं. २४४. तारेचा पत्ता : " जनता बँक "

| प्रगतीपथावरील वाटचाल | प्रारंभ | ३०-६-६१ | ३१-१२-६१ | ३०-६-६२ |
|---|---|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. ५,००,०००| रु. ५,००,००० | रु. ५,००,००० | रु. ५,००,००० |
| खपलेलें व वसूल झालेलें शेअर भांडवल | रु. १,११,५०० | रु. १,३९,११५ | रु. १,५१,००० | रु. १,५६,४०० |
| एकूण ठेवी | रु. ७५,००० | रु. १,८३,६०० | रु. ९,५०,००० | रु. ८,९०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,८८,००० | रु. ६,४१,५०० | रु. ७,४०,००० | रु. २०,५५,५०० |

★ आकर्षक व्याजाचे दरानें सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

★ बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

★ एक वेळ अवश्य भेट द्यावी, अशी नम्र विनंती.

एस्. एस्. पांड्याजी, मॅनेजर. वसंतराव ब. पाटील, व्हा. चेअरमन. एम्. एस्. कराळे, चेअरमन.


# माझा बाप गाडग्यांत पैसे ठेवायचा ...

अडीअडचणीला उपयोगी पडावेत म्हणून माझा बाप गाडग्यांत पैसे ठेवायचा. पण त्यांत चोरीची धास्ती असायची. आतां काळ बदलला. मोटे ऐवजीं इंजिनं आलीं, रापा ऐवजीं मिश्र खतं आलीं. त्याप्रमाणें पैसा सुरक्षित ठेवायला महाराष्ट्र बँकेची सोय झाली. मी तर माझा पैसा अडका महाराष्ट्र बँकेंतच ठेवतों. तेथें पैसा सुरक्षित राहून त्यावर व्याजहि मिळतें व अडीअडचणीला ते काढतां येतात. महाराष्ट्र बँकेत खातं उघडणंहि अगदीं सोपं आहे. तेथील वागणूक किती आपुलकीची असते! मला तर वाटतं प्रत्येकानं महाराष्ट्र बँकेंतच खातं उघडावं.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें-२

महाराष्ट्र बँकेचे शाखाधिकारी खातें उघडण्यास सर्व प्रकारें मदत करण्यास आनंदानें तयार असतात.



Prat-bha-62-6

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व ' दुर्गाधिवास ' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.